Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४६] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १३-१९, २०२५/कार्तिक २२-२८, शके १९४७ [पृष्ठे ४ किंमत : रुपये १०.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितींची रजा (भाग एक-अ चार-अ, चार-ब व चार-क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ. केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-४ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-१५ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३३.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ खालील (१) ची अधिसूचना**

क्रमांक कावि-स.म.अ.-भुसं-६५५-२०२५.—

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमि संपादन, पुनर्वसन के पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक १२९६, दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या

अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या-सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्ह्याच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहेः

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी (भूसंपादन), जळगांव जामोद, ता. जळगांव जामोद जि. बुलडाणा यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३/२०२२-२३, गाव वारखेड, तालुका संग्रामपुर, जिल्हा बुलडाणा.

| अ.क्र. | संपादित करावयाचे क्षेत्र | | वगळणी करण्यात आलेले क्षेत्र | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | हे. आर | | हे. आर | कार्यकारी अभियंता जिगांव प्रकल्प, धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांचे पत्र जाक्र ३२८१/२०२५ दिनांक ३० जुलै, २०२५ नुसार प्रकरणामध्ये क्षेत्र १३.३६ हे आर मध्ये एकूण १३ भूधारक असून त्यापैकी १० भूधारकांची सरळ खरेदीने जमीन संपादित करण्यात आली आहे. सदर क्षेत्र वगळून उर्वरित ३ लाभधारकांची २.०५ हे. आर साठी कलम १९ ची कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. |
| १ | ६० | ० ८० | ९४ | ० ८१ | |
| २ | ६४ | ० ४७ | ९३ | ० ४८ | |
| ३ | ८० | ० ७८ | ९३ | १ ४१ | |
| ४ | | | ७९ | ० ८३ | |
| ५ | | | ७९ | १ ०१ | |
| ६ | | | ७७ | १ ६२ | |
| ७ | | | ७७ | १ १० | |
| ८ | | | ६३ | १ २१ | |
| ९ | | | ६२ | १ ६९ | |
| १० | | | ७६ | १ १५ | |
| | एकूण . . | २ ०५ | | ११ ३१ | |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- | अरकचेरी प्रकल्प, तालुका संग्रामपुर, जिल्हा बुलडाणा. |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :- | मौजे वारखेड, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथील खाजगी जमीनीचा भूसंपादन प्रस्ताव. |
| समाजाला मिळणारे लाभ | :- | या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामिण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे. |

## अनुसूची-तीन

## बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

सदर प्रकल्प हा सिंचनाचा अनुशेष दुर करण्यासाठी आवश्यक असून दुष्काळ प्रवण भागातील कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून त्यास शेतकऱ्यांची संमती आहे. यामध्ये कोणतीही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्याने तसेच त्यामधील विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-चार

## सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश

नवीन भूसंपादन कायदा, २०१३ कलम (६) मध्ये अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणतून सूट आहे.

या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामिण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामिण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमीहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्यामुळे भूसंपादनास शेतक-यांची संमती आहे. तसेच सदरचा प्रकल्प हा अनुषेशग्रस्त जिल्ह्यातील दुष्काळ प्रवण भागातील असून कमी क्षेत्रावर आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम शेतजमिनीवर असून यामध्ये वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**टीप:-** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, जळगांव जामोद कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : ६ आक्टोबर, २०२५.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३४.

## जिगांव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा प्रस्तुत प्रकरणात कलम-१९ ची कार्यवाही करिता (सहा) ०६ महिण्याची मुदतवाढ मिळणे बाबत.

## भूसंपादन प्रकरण क्र.०१/२०२४-२०२५ मौजे सावरगांव (शेतजमीन) ता. जळगांव जामोद.

**संदर्भ:** (१) उपजिल्हाधिकारी भूसंपादन,(ल.सिं.का.) जि. का. बुलढाणा यांचे कार्यालयाचे पत्र. जा. क्र. भूसंपादन (ल.सिं.का.) म.स./ कावि/ ४०६/२०२५ दिनांक १७/१०/२०२५.

(२) कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांचे कार्यालयाचे पत्र जा.क्र.४६१८/जिगांव/रेचिशा-३/भू.स./ सावरगांव / मुदतवाढ / २०२५ दिनांक १७/१०/२०२५.

## आदेश

क्रमांक कावि-सअभूस-कक्ष ७-२-१५३३-२०२५.—

उपजिल्हाधिकारी भूसंपादन, (ल.सिं.का.) जि. का. बुलढाणा यांनी भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१/२०२४-२०२५ मौजे सावरगांव (शेतजमीन) ता. जळगांव जामोद जि. बुलढाणा ( क्षेत्र - १.३५ हे. आर. कलम ११ नुसार) प्रकरणामध्ये कलम ११ (१) च्या अधिसुचनेस दिनांक २० सप्टेबर, २०२४ रोजी एकूण १.३५ हे. आर. क्षेत्रास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. कलम ११ (१) च्या अधिसूचनेची अंतिम प्रसिध्दी दैनिक वृत्तपत्रात दिनांक ३१ आक्टोबर, २०२४ रोजी करण्यात आली त्यानुसार प्रकरणाचा व्यपगत दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ आहे.

कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग, शेगांव यांनी प्रकरणातील यांनी कलम १९ करीता निधीची मागणी महामंडळाकडे केलीली असुन निधी प्राप्त होण्याकरीता साधारणतः (सहा) ०६ महिण्याचा कालावधी लागणार असल्यामुळे भूसंपादन प्रकरण ०१/२०२४-२०२५ मौजे सावरगांव (शेतजमीन) ता. जळगांव जामोद जि. बुलढाणा सदर भूसंपादन प्रकरण व्यपगत होऊ नये या करीता कार्यान्वीन यंत्रणा तसेच उपजिल्हाधिकारी भूसंपादन (ल.सिं.का.) जि.का.बुलढाणा यांनी उक्त प्रकरणास कलम १९ (१) ची उद्घोषणा घोषीत करण्यास (सहा) ०६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी अशी संदर्भीय पत्रान्वये विनंती केली आहे.

ज्याअर्थी, भूसंपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत या मध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (७) नुसार जेव्हा प्राथमीक सूचनेच्या तारखेपासून १२ महिण्याच्या कालावधीत पोट कलम (१) मध्ये कोणतीही घोषणा प्रसिध्द केलेली नसेल तेव्हा अशी घोषणा रद्द करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. परंतु या पोट कलमात निर्दिष्ट केलेला कालावधी मोजतांना कोणत्याही न्यायालयाच्या आदेशाव्दारे दिलेली कोणतीही स्थगितीमुळे किंवा मनाई हुकूमामुळे जमिन संपादनाची कार्यवाही थांबलेली होती असा कोणताही कालावधी

वगळण्यात येईल किंवा असे कोणतेही कालावधी वगळण्यात येतील.

परंतु, आणखी असे की, समूचित शासनाच्या मते, जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, त्याला बारा महिण्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल, अशी तरतुद आहे.

त्याअर्थी, भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत या मध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (७) नुसार भूसंपादन प्रकरण ०१/२०२४-२०२५ मौजे सावरगांव (शेतजमीन) ता. जळगांव जामोद जि. बुलढाणा (१.३५ हे.आर.) या भूसंपादन प्रकरणास कलम १९(१) ची अधिसूचना घोषित करण्यास ६(सहा) महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

**डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी,
बुलढाणा.

बुलढाणाः
दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.